**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. १२/२०१५** **दि. ०३.०६.२०१५**

| | | |
|---|---|---|
| **श्री प्रसन्न प्रभाकर मयेकर**<br>**घर नं. ९८१/ब,आरे-वारे बीच जवळ**<br>**धामेळे,मु.पो. कोतवडे**<br>**ता./जि. रत्नागिरी** | } | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय रत्नागिरी** | } | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | } | **१) श्री. वि. रा. कांबळे,**<br>**सचिव तथा कार्यकारी अभियंता**<br>**२) श्री. ज. पु. बिवलकर**<br>**सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | } | **१) श्री .सुनिल सुधाकर काळे**<br>**(प्रतिनिधी)** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | } | **१) श्री. अजित अस्वले**<br>**अतिरिक्त कार्यकारी अभियंता, रत्नागिरी**<br>**२) श्री. पुरुषोत्तम शां. गांधी**<br>**उपकार्यकारी कार्यकारी अभियंता,**<br>**ग्रामीण -२ जाकादेवी**<br>**३) प्रतिक भिमराव माने**<br>**कनिष्ठ अभियंता,शाखा कार्यालय,**<br>**कोतवडे** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

श्री प्रसन्न प्रभाकर मयेकर, घर नं.९८१/ब आरे-वारे बीच जवळ,धामोळे,मु.पो. कोतवडे,जि.रत्नागिरी यांनी श्री प्रभाकर रामजी मयेकर घर नं. ९८१ ब स.नं.२६८/७अ धामोळे कोतवडे याठिकाणी शेतपंपाचे (२ अश्वशक्ती) वीज जोडणी साठी मागणी सन २००८ साली केली होती. व त्यांना तेव्हापासून ते मे २०१५ व आजअखेर वीज जोडणी न झाल्यामूळे दि.०३.०६.२०१५ रोजी 'अ' नमुन्यातील तक्रारी अर्ज मंचास सादर केला आहे. व त्या तक्रारीचाक्र.१२ असा आहे.

तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्र.७९ दि.०४.०६.२०१५ अन्वये कार्यकारी अभियंता रत्नागिरी विभाग यांचेकडे स्पष्टीकरण मागविण्यात आले. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता रत्नागिरी यांचेकडून त्याचें पत्र क्र.३६५३ दि.२६.०६.२०१५ अन्वये लेखी स्पष्टीकरण मंचास सादर केले. त्यानंतर महाराष्ट्र वीज नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनिमय २००६ च्या कलम ६.१४ नुसार उभयपक्षकारांना दि.२३.०६.२०१५ रोजी नोटीस पाठवून तक्रारी संबंधीची सुनावणी दि.०८.०७.२०१५ रोजी ठेवण्यात आली.

दि.०८.०७.२०१५ रोजी सुनावणीच्या वेळी तक्रारदारातर्फे त्याचे प्रतिनिधी श्री सुनिल सुधाकर काळे ग्राहक प्रतिनिधी व महावितरण कंपनीतर्फे श्री अजित अस्वले, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, रत्नागिरी, श्री पुरुषोत्तम शां. गांधी, उपकार्यकारी अभियंता, ग्रामीण-२ जाकादेवी व श्री प्रतिक भि. माने कनिष्ठ अभियंता, शाखा कार्यालय, कोतवडे हे उपस्थित राहिले. व आपआपला युक्तिवाद मंचासमोर सादर केला.

तक्रारदार ग्राहकातर्फे श्री सुनिल सुधाकर काळे यांनी सुनावणीमध्ये उपस्थित राहून युक्तिवाद करताना कथन केले की वीजपुरवठा अर्ज सन २००८ मधे सादर करुन, व्कोटेशन प्रमाणे महावितरणला रक्कम जमा केली असून सुध्दा मे २०१५ पर्यंत म्हणजे ७ वर्षे झाली तरी श्री प्रभाकर रामजी मयेकर यांना वीजपुरवठा करण्यात आलेला नाही. व विनाविलंब वीजपुरवठा सुरु व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. महावितरणने सन २०१३ च्या अखेरीस वीजजोडणीसाठी लागणारे १६ खांब उभे केलेचे ही सांगितले. तसेच परंतु खांब उभे करणे व लाईन ओढण्यास वनविभागाने आक्षेप घेतला असलेचे महावितरणकडून आम्हाला दि.१७.०१.२०१४, ११.११.२०१४ व दि.२८.११.२०१४ लेखी पत्राने कळविलेचे व त्यामुळे वनखात्याच्या परवानगीसाठी काम थांबलेचे माहित आहे असे सांगितले.

त्यांनतर तक्रारदार यांनी दि.१७.०३.२०१५ व ०७.०४.२०१५ रोजी स्वतः हरकतीबाबत वनविभागास पत्र व्यवहार करुन हरकतीसंबंधी चौकशी केली, पण त्यांना लिखीत स्वरुपाचे पत्र वनखात्याकडून मिळाले नाही म्हणून स्वतः तक्रारदार यांनी वनखातेच्या रत्नागिरी व चिपळूण कार्यालयात चौकशी केली असता त्याना वनखात्याने " खांब उभे करणे व विद्युत वाहिनी जोडणी हे काम करताना परवानगीसाठी विशिष्ट प्रस्ताव महावितरणने वनविभागाकडे पाठवणे आवश्यक असलेचे सांगितले, तो आजून त्यांनी पाठविला नाही. श्री काळे यांनी सदर प्रस्तावासाठी लागणारे विहीत फॉर्महीं वनविभागाकडून घेऊन महावितरणकडे सुपुर्द केले आहे. तरी सदर प्रस्ताव त्वरीत पाठवावा जेणकरुन पुढील कार्यवाहीला गती येईल असे ही सांगितले.

तक्रारदाराने अद्यापपर्यंत सहकार्य केले आहे तसेच यापुढेही करण्यात येईल. नियोजित जागेतून वनखात्याकडून परवानगी न मिळाल्यास पर्यायी दुस-या जागेतून खांब उभा करुन लाईन देणेसाठी सर्वेक्षण होऊन काम व्हावे असे म्हटले आहे व त्यामधील हरकती मिटवून देणेसाठी सहकार्य करणेचे ही त्यांनी मान्य केले आहे.

महावितरणतर्फे श्री अस्वले यांनी कार्यकारी अभियंता विभाग रत्नागिरी यांनी सुनावणी दरम्यान कथन केले की सदर ग्राहकास कनेक्शन देणेसाठी एचटीलाईन २.४ km, LT line- ०.२५ km व T/c =१/२५ kva इतके लाईनचे काम करणे आवश्यक असलेचे सांगितले. त्याचप्रमाणे सदर ग्राहकाच्या प्रतिक्षा यादीमधे २० वा नंबर आहे. व सदर वीजजोडणीसाठी डिसेंबर २०१३ मधे १६ एचटी लाईनचे पोल उभे केले आहेत. परंतु वनखात्याच्या हरकतीमुळे काम थांबल्याचे सांगितले. तथापी वनखात्याला लेखी पत्र व्यवहार करुनही वनखात्याकडून पोल उभे करुन लाईन ओढणेसाठी परवानगी मागितली असून सुध्दा वनखात्याची परवानगी मिळाली नाही, परंतु सदर जागेतून लाईनचे काम केले तर कायदेशीर कारवाई करणेचे दि. १७.१२.२०१३ व दि.१८.०१.२०१४ च्या पत्राने वनखात्याने महावितरण कार्यालयास कळविले आहे. दि.१७.०१.२०१४ व २९.०१.२०१४, १४.०५.२०१५ च्या पत्राने महावितरणने परवानगीसाठी लागणारा नकाशावर नोंद करणेबाबत विनंती केली व परवानगी मागितली आहे परंतु त्याचेकडून कोणत्याप्रकारे लेखी उत्तर किंवा प्रस्ताव पाहिजे असे त्यांनी कळविलेले नाही. याबाबत ग्राहकास पत्र क्र.१७.०१.२०१४ व दि.११.११.२०१४ दि.२८.११.२०१४ ने कळविले आहे व त्यामुळे सदर काम थांबलेले आहे.

त्यानंतर अस्वले म्हणाले की वीज पुरवठयासाठी खांब उभे करणे, विद्युत वाहिनी जोडणी यासाठी आलेली हरकत दूर करण्याची जबाबदारी ही तक्रारदाराची /ग्राहकाची आहे. या म्हणण्याच्या पुष्टयर्थ त्यांनी विद्युत लोकपाल मुंबई यांच्या एका अभिवेदनासंबंधातील Representation No.८३ of २०१३ order dt. २५.१०.२०१३ चे निर्णयाचा संदर्भ दिला आहे. तसेच विद्युतपुरवठा संहिता २००६ च्या विनियम ५.८ च्या तरतुदीनुसार वनविभागाची परवानगी मिळविण्याची जबाबदारी ग्राहकाची आहे असे त्यांचे रत्नागिरी विभागाच्या पत्र क्र.३६५३ दि. २५.०६.२०१५ मध्ये नमुद केले आहे.

असे असले तरी वनविभागाकडे सातत्याने लेखी पाठपुरावा चालू आहे परंतु वनविभागाकडून कोणतेही परवानगीचे (लेखी) उत्तर प्राप्त झाले नाही. तक्रारदार यांचे प्रतिनिधी यांनी सध्या उपलब्ध करुन दिलेल्या प्रस्तावाच्या नमुन्याप्रमाणे वनविभागाकडे पाठविण्याची तयारी असल्याचे श्री अस्वले व गांधी यांनी मान्य केले मात्र परवानगीसाठी लागणारे शुल्क ग्राहकाने भरले पाहिजे असे कथन केले. मंचाच्या प्रश्नाला उत्तर देताना श्री अस्वले यांनी वनविभागाची हरकत दूर झाल्यानंतर ३ महिन्यात वीज पुरवठा देणेचे आश्वासन दिले सध्या १६ खांब उभे करण्याचे काम झाले असून आणखी १२ खांब व रोहित्र उभारणी करावी लागेल अशी माहिती दिली.

मूळ अर्जदार श्री प्रभाकर रामजी मयेकर हे असून तक्रारदार ते नसून अन्य व्यक्ती श्री प्रसन्न प्रभाकर मयेकर आहेत ही विसंगती ही श्री अस्वले यांनी निर्दशनास आणली. तसेच वनविभागाची लिखीत परवानगी न मिळाल्यास पर्यायी दुसऱ्या जागेतून सर्वेक्षण करण्याचे ही मान्य केले. परंतु सदर ठिकाणी जर अडथळे आल्यास ग्राहकानी ते सोडविण्याचेही प्रयत्न करण्याचे आहेत असे सुचविले.

उभयपक्षानी दाखल केलेले दस्तऐवज व सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद लक्षात घेता असे निर्दशनास येते की,

अर्जदार श्री  प्रभाकर रामजी मयेकर यांनी वीजपुरवठयाचा अर्ज फेब्रुवारी २००८ मध्ये दाखल केला व त्यानंतर विद्युतभार जोडणीबाबतची मंजूरी जानेवारी २०११ महावितरणतर्फे देण्यात आली व ग्राहकाने दि.१८.०२.२०११ रोजी  रक्कम रु. २४२५/- जमा केली असताना त्यानंतर सन २०१३ च्या डिसेंबर महिन्यात खांब उभारणीचे काम सुरु झाले व १६ खांब उभा केले. व त्यावेळी वनविभागाकडून हरकत घेण्यात आली व ती हरकत महावितरणने दि. १७.०१.२०१४, २१.०१.२०१४, ११.११.२०१४ व १४.०५.२०१५ रोजी केलेल्या ३ ते ४ वेळच्या पत्रव्यवहाराने ही दूर न होता सदर जागेत  काम केलेस कंपनीवर कारवाई करणेत येईल असेच उत्तर वनखात्याकडून त्याचे कार्यालयाचे पत्र क्र  १७.१२.२०१३ व १८.०१.२०१४ चे  पत्रानुसार दिसते. सदर वनखात्याची परवानगी न मिळालेमुळे व ती हरकत अद्याप  दूर न झाल्याने वीजपुरवठा करणेचे काम थांबले आहे. ग्राहकाने सन २००८ मध्ये अर्ज करुन सन २०११ मध्ये रक्कम भरण्यासाठी क्वोटेशन दिले. कृतीमानकांच्या विषयीच्या लागू असलेल्या विनियमाप्रमाणे क्वोटेशन ३० दिवसात देणे ऐवजी ३ वर्षाचे कालावधीने दिले या टप्प्यावर महावितरणचा विलंब झाला आहे तसेच कृतीमानकांच्या विनिमय ४.६ प्रमाणे अर्ज प्राप्त झालेपासून १ वर्षाचे आत वीजपुरवठा  सुरु करणे आवश्यक होते. परंतु सदर काम डिसेंबर २०१३ मध्ये चालू केलेचे दिसते. त्यावेळी वनखात्याची तक्रार आली व कामही थांबले. महावितरणने सन २००८ ते डिसेंबर २०१३ पर्यंत वनखात्याच्या हरकतीबाबत किंवा त्रुटीबाबत कळविणे गरजेचे असताना तसे केले नाही म्हणजे त्याचवेळी तो अर्ज परिपूर्ण झाला असता म्हणून विनियम ४.६ चे उल्लंघन महावितरणकडून झालेले आहे.सदर प्रकरणामध्ये मूळः ग्राहकाचा अर्जच वनखात्याची परवानगी मिळेपर्यंत पूर्ण होत नाही व त्यामुळे निश्चित कालावधीमध्ये काम होऊ शकले नाही. असे महावितरणचे म्हणणे आहे तसेच श्री. अस्वले अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी कथन केले की, वीज पुरवठयासाठी खांब उभे करणे विद्युत वाहिनी जोडणीसाठी आलेली हरकत दूर करण्याची जबाबदारी ही तक्रारदाराची /ग्राहकाची आहे.या म्हणण्याच्या पुष्टयर्थ त्यानी विद्युत लोकपाल मुंबई यांच्या एका अभिवेदना संबंधातील (Representation No.८३ of २०१३ order dt.२५.१०.२०१३) जोडले आहे त्यातील para No..५ असा आहे.

" Documents on record and proceedings during the hearing reveal that on submission of application and payment of charges for giving supply, the Respondent took up the work of LT electric line and erected poles along Gram Panchayat road.  The work was stopped on a written objection raised by the Gram Panchayat.  It is Appellant's responsibility to submit relevant documents including way leave permission required as per Regulation 5.8 of the Electricity Supply Code Regulations, 2006. An application means complete in all respects as required by the Distribution Licensee, alongwith documents showing payment of charges and other compliances as per Section 43 (1) of the Electricity Act, 2003.  The Appellant is entitled to get compensation for the delay in provision of supply from date of completed application as per Serial No. 1 (iii) Appendix A of the Standards of Performance Regulations, 2005.  Although Appellant's application is not complete in terms of the said provisions."

१) सदर केसमध्येही वीज पुरवठा करण्यासाठी लाईनचे पोल उभे करत असताना डिसेंबर २०१३ मध्ये वनखात्यानी लेखी हरकत देऊन काम थांबवले आहे. काम थांबवण्याबाबतचे वनखात्याची दि. १७.१२.२०१३ व १८.०१.२०१४ पत्रे आहेत.

२) महाराष्ट्र वीज नियामक आयोग (वीज पुरवठा संहिता व पुरवठयाच्या अन्य अटी विनियम २००५ कलम ५.८) प्रमाणे जागेबाबतची way leave permission ही ग्राहकानेच मिळवायची आहे. तथापी अधिनियमातील कलम ४२ प्रमाणे वितरण व्यवस्था निर्माण करणेची जबाबदारी महावितरणची आहे व Works of Licensees Rules २०१२ च्या कलम ३ च्या परंतुकाप्रमाणे जमीन मालकाची हरकत असल्यास महावितरणने जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी 'Way Leave Permission' चा मुद्दा लागू होत नाही.

३) As per Electricity Act २००३ Section ४३ (१) An application means complete in all respects as required by distribution licensee along with documents showing payment of charges and other complianes.

सदर केसमध्ये काम करण्यास विलंब लागणेचे कारण हे सदर ग्राहकास कनेक्शन देणेसाठी जी लाईन ओढावी लागते ती उभी करण्यासच वनखात्याची हरकत असून परवानगी मिळत नाही. त्यामुळे काम हे थांबले आहे. सदर केसमध्ये ग्राहकासाठी ओढावी लागणारी लाईन ही वनखात्याच्या हद्दीतून न्यावी लागते याची कल्पना स्वत: ग्राहकाला व महावितरणला प्रत्यक्ष काम चालू होईपर्यंत माहित नसलेचे दिसते.

सदर केसमध्ये प्रथम महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करण्याचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनिमय, २०१४ मधील ४.१० नुसार " वैधानिक मंजुऱ्या, वहिवाटांचा हक्क, जमीन संपादन किंवा ग्राहकांचा त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यातील विलंब, यासंदर्भात कोणताही विलंब झाल्यास, जो वाजवी नियंत्रणाच्या बाहेर असेल, त्यासाठी वितरण परवानाधारकास जबाबदार धरणेत येणार नाहीत" हे विचारात घेणे आवश्यक आहे. मात्र सन २००८ ते २०१३ पर्यंतच्या विलंबास महावितरण जबाबदार आहे. वनखात्याची प्रस्तावानुसार परवानगी मिळाली तरच वीज जोडणी होऊ शकते अथवा पर्यायी सर्वेक्षण होऊन विनातक्रार लाईन ओढणेचे काम दुसरे जागेतून झाल्यास वीजजोडणी देता येईल.

सदर केसमध्ये शेतीपंपाची मागणी ही श्री प्रभाकर रामजी मयेकर मूळ अर्जदार ग्राहक यांचे नावावर आहे. मंचातील तक्रार ही श्री प्रसन्न प्रभाकर मयेकर यांनी केली आहे. श्री प्रभाकर रामजी मयेकर मयत असलेचे श्री काळे ग्राहक प्रतिनिधी यांनी सुनावणी दरम्यान सांगितले आहे. त्यामुळे सदर ग्राहकासाठी काम करण्यापूर्वी अर्जदार श्री प्रसन्न प्रभाकर मयेकर यांनी नाव बदलाबाबतचीही सर्व कायदेशीर कागदपत्रे महावितरणकडे त्वरीत जमा करुन नावात बदल करुन घेणे आवश्यक आहे. तसे करण्याचे उभयपक्षाने सुनावणी दरम्यान मान्य केले आहे. तसे केल्यास कार्यवाही परत थांबते. त्यामुळे वीज जोडणी देणेसाठीचा कालावधी मंचास निश्चित करता येणे अशक्य आहे.

सदर केसमध्ये ग्राहकाने उपलब्ध करुन दिलेला वनखात्याकडील विहीत नमुन्यातील प्रस्ताव त्वरीत तांत्रिकदृष्टया महावितरणने भरुन (पूर्ण करुन) वनखात्याला पाठविणेचे आहे व त्याचप्रमाणे लागणारी जागेबाबतची कागदपत्रेही ग्राहकाने देऊन सदर प्रस्ताव वनखात्याकडे गेल्यानंतर संयुक्तिकरित्या उभयपक्षानी वनखात्याशी पाठपुरावा Follow up करुन परवानगी

मिळविणेचे प्रयत्न करावयाचे आहेत व त्यास मंचापुढे उभयपक्षानी सहमती दर्शविली आहे. परवानगी मिळाल्यानंतर ३ महिन्यात वीजजोडणी देण्याचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता रत्नागिरी यांनी मान्य केले आहे.

त्याप्रमाणे उचीत कार्यवाही संयुक्तपणे महावितरण अधिकारी व ग्राहक यांनी त्वरीत करणे जरुरीचे आहे.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती लक्षा घेता मंच खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

# आदेश

**१) ग्राहकाच्या वीज पुरवठयासाठी वनविभागाची हरकत असल्यामुळे तक्रारदारांची तक्रार अमान्य करण्यात येत आहे.**

**२) तक्रारदार यानी श्री प्रभाकर रामजी मयेकर यांच्या मृत्युचा दाखला श्री प्रसन्न प्रभाकर मयेकर हे कायदेशीर वारस असल्याबाबतचा पुरावा देऊन अर्जातील नावांत बदल करुन घेण्याची पूर्तता त्वरीत करावी.**

**३) महावितरणच्या उपविभाग जाकादेवी ग्रामीण-२ यानी वनविभागाची परवानगी मिळण्यासाठी त्वरीत प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करुन परवानगी मिळवावी यासाठी ग्राहकाने महावितरणला सहकार्य करावे.**

**४) पर्यायी जागेतून वीज पुरवठा करण्याची शक्यता तपासून पहावी.**

**५) वनविभागाची हरकत दूर होताच लवकरात लवकर परंतु कोणत्याही परिस्थितीत ३ महिन्यांचे आत ग्राहकास वीज पुरवठा सुरु करावा.**

**६) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**श्री .वि.रा. कांबळे**
**सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**श्री ज.पु.बिवलकर**
**सदस्य**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- २२.०७.२०१५**
**ठिकाण :- रत्नागिरी.**